Navshakti

# टीकरतर्फे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून नव्या उत्पादनांची घोषणा

**वृत्तसंस्था**

मुंबई, रविवार - टीकर प्लांट लिमिटेड हा भारतातील सर्वात मोठा फायनान्शियल मार्केट डेटा, माहिती आणि विश्लेषण आधारित पुरवठादार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) वर बेतलेल्या आर्थिक विश्लेषण क्षेत्रात योजनांची घोषणा टीकरच्या वतीने नुकतीच करण्यात आली. संपूर्ण दिवस चालणाऱ्या परिषदेचे शीर्षक 'ॲनलिटीक्स इन मार्केट्स' (एम २०१८) असून त्याचे आयोजन इंडियन स्टॅटेस्टीकल इन्स्टीट्युट (नॉलेज पार्टनर) धीरूभाई अंबानी इन्स्टीट्युट ऑफ इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नोलॉजी (पार्टनर-टेक्नोलॉजी इन्स्टीट्युट) यांच्याद्वारे एकत्रितपणे करण्यात आले होते. अशा ऑफर्सची मदत गुंतवणूकदार आणि कॉर्पोरेट्सना वित्तीय बाजारपेठांमधील किंमतीची हालचाल टिपायला होते.

टीकरचे उद्दिष्ट्य मशीन लर्निंग, आर्टीफिशियल इंटेलिजन्स, नॅचरल्स लॅन्ग्वेज प्रोसेसिंग इत्यादी वापरून ॲनलेटीकल टूल्स इत्यादी पुढील काही महिन्यांत पहिल्या सेटसोबत आणण्याचे आहे. अशाप्रकारची नवीन भर पडल्याने व्यापारी मालमत्तेच्या किंमतीचे आकलन सुधारण्याची अपेक्षा आहे. अशा पद्धतीची उत्पादने एमव्हीटी आणि एमव्हीएम या टीकरच्या मुख्य उत्पादनांचा भाग बनतील.

प्रमुख वक्ते डॉ. सॅम पित्रोदा यांनी जीवन आणि व्यापारात तंत्रज्ञानाची भूमिका स्पष्ट केली. तसेच आज भारत तंत्रज्ञान वापर बदलात मुख्य भूमिका बजावत असल्याचे सांगितले.

टीकरचे जॉइंट सीईओ अरिंदम साहा म्हणाले की, मागील दहा वर्षांपासून टीकर सुमारे १००० कॉर्पोरेट्ससोबत संलग्न आहे. आधुनिक तंत्राचा वापर करून ॲनलेटीकल टूल्सकरिता मोठी मागणी असल्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. टीकर गेली बरेच वर्षे बाजारात वित्तीय माहितीशी निगडीत कार्यरत असल्याने उत्पादन आधारित कृत्रिम बुद्धिमत्तेकडे वळण्याच प्रक्रिया नैसर्गिक प्रगती म्हणाव लागेल.

इंडियन स्टॅटेस्टीकल इन्स्टीट्युटचे डॉ. दिगंता मुखर्ज म्हणाले की, भावनांचा उपयोग वित्तीय मालमत्ता किंमतीचा हो वर्तवण्यासाठी करणे हे बाजारातील व्यावसायिकांमधील मुख्य क्षेत्राच उदय ठरते आहे. एनएसई बीएसई, टार्गेट इन्फोसिस अन्नामलाई युनिव्हर्सिटी, केअ लब, आदित्य इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंटसारख्या संघटनांशी संबंधित २५ वक्त्यांनी विचार मांडले आणि केस स्टडीज सादर झाल्या.